पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - १०/०९/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१०/०९/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.जाधव साधना रामदास - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंमद
३. मा.जयश्री वसंत गावडे
४. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५. मा.आल्हाट मंदा उत्तम
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.बो-हाडे शुभांगी संजय
८. मा.भालेकर अरुणा दिलीप
९. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.कुलकर्णी, - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.वाघ - उप अभियंता (झोनिपु) मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया करणा-या दांपत्यास अर्थसहाय्य - मा.स्वाती साने, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) महिलांसाठी शिवणकाम प्रशिक्षण चालू करणेबाबत - मा.अमिना पानसरे, मा.संगिता पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) महापालिका शाळेतील मुलींना सॅनटरी नॅपकीन पुरविणेबाबत - मा.अरुणा भालेकर, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २७/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ८ विषय क्रमांक : १
दिनांक : १०/०९/२०१४
सुचक : मा.स्वाती साने अनुमोदक : मा.अरुणा भालेकर
संदर्भ :- मा.स्वाती साने, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल विकास योजनेअंतर्गत एका मुलीवर किंवा दोन मुलींवर कुटूंबनियोजन शस्त्रक्रीया करणा-या दांपत्यास अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत मुलीच्या जन्माची अट सन २००७ ऐवजी जानेवारी २००० अशी करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमजबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ९ विषय क्रमांक : २
दिनांक : १०/०९/२०१४
सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.संगीता पवार
संदर्भ :- मा.अमिना पानसरे, मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव -

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमात महिलांसाठी “ शिवणकाम प्रशिक्षण ” हा विषय अंतर्भूत करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमजबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०                                                        विषय क्रमांक : ३

दिनांक : १०/०९/२०१४

सुचक : मा.अरुणा भालेकर                                                 अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ :- मा.अरुणा भालेकर, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरातील महिलांसाठी व मुला, मुलींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.  परंतु यामध्ये मुलींसाठी वैयक्तीकदृष्टया अत्यंत महत्वाची असणारी मुलींना सॅनटरी नॅपकीन पुरविणेबाबतची महत्वाची व अत्यावश्यक योजनेचा समावेश नाही. त्यामुळे मनपा शाळेतील इ.७ वी ते १० वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना सॅनटरी नॅपकीन मोफत पुरविणेची योजना त्वरित लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )

**सभापती**

महिला व बालकल्याण समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/७७०/२०१४

दिनांक : १०/०९/२०१४



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.